
EQUIFAX

sidbi

# मायक्रोफायनान्स पल्स

अंक 9 - जुलै 2021



# वैश्लेषिक संपर्क


## इक्विफॅक्स

किरण समुद्रला
उपाध्यक्ष वैश्लेषिक
kiran.samudrala@equifax.com

श्रुती जोशी
सहाय्यक उपाध्यक्ष - वैश्लेषिक
shruti.joshi@equifax.com

वंदना पांचाळ
वरिष्ठ कार्यकारी - वैश्लेषिक
vandana.panchal@equifax.com

## सिडबी

कैलाश चंद्र भानू
मुख्य महाव्यवस्थापकसीएस व आरव्ही-ईआरडीए
erdav@sidbi.in

रंगदास प्रभावती
उप महाव्यवस्थापक - सीएस व आरव्ही-ईआरडीए
erdav@sidbi.in

रमेश कुमार
व्यवस्थापक-सीएस व आरव्ही-ईआरडीए
rameshk@sidbi.in

# अनुक्रमणिका


| | |
|---|---|
| कार्यकारी सारांश | 04 |
| संक्षेप आणि शब्दावली | 05 |
| सूक्ष्मवित्त उद्योगाचे अवलोकन | 06 |
| वितरणाचे कल | 09 |
| उद्योग जोखमीची प्रोफाइल | 12 |
| भौगोलीक व्याप्ती | 14 |
| सर्वसमावेशक राज्य प्रोफाईल : कर्नाटक | 17 |
| महत्वाकांक्षी जिल्हे | 22 |
| कोविड-19 आणि भौगोलिक कल | 24 |

# कार्यकारी सारांश

कोविड महामारीमुळे पुरवठा साखळी आणि व्यवसाय परिचालनात अडसर निर्माण झाल्यामुळे सूक्ष्म वित्त क्षेत्रात विशेषत: कमी उत्पन्न गटावर गंभीर परिणाम झाला आहे. या मायक्रोफान्स पल्सच्या 9 व्या आवृत्तीमधे 31 मार्च 2021 च्या डेटा संकलनावर आधारित सूक्ष्मवित्त उद्योगातील कल आणि प्रगतीचा समावेश आहे.

31 मार्च 2021 रोजी सूक्ष्मवित्त उद्योगाचा पोर्टफोलियो शिल्लकबाकीचा आकार ₹249,277 करोड आहे. बँका आणि एनबीएफसी-एमएफआय यांच एकूण पोर्टफोलिओमधे 75% पेक्षा जास्त योगदान आहे. सूक्ष्म वित्त उद्योगाने मार्च 2020 ते मार्च 2021 या काळात वर्षगतवर्ष तुलनेत (YoY) पोर्टफोलिओ शिल्लकबाकी मधे 18% वाढ नोंदवून त्याची संयोगक्षमता, पुनर्प्राप्ती आणि कोविड-पूर्व स्थितीत परत येण्याची क्षमता दाखवून दिली आहे. कर्जदात्या श्रेणींमध्ये, बँकांनी बाजारातील वाटा सातत्याने वाढवून 36%ची सर्वाधिक वर्षगतवर्ष वाढ नोंदवली आहे.

जानेवारी फेब्रुवारी मार्च 21(JFM 21) दरम्यान सूक्ष्मवित्त उद्योगाने ₹ 93,100 कोटीचे कर्ज वितरित केले. कर्जवितरणात JFM 20 ते JFM 21 या काळात वर्षगतवर्ष तुलनेत संख्यात्मक दृष्टीने 17% तर रकमेने 26% वाढ झाली. कर्ज वितरणात, बँकांच योगदान सर्वच तिमाही मधे सर्वात जास्त होते. वितरित कर्जाची संख्या आणि अखिल भारतीय सरासरी तिकीट आकार(एटीएस) OND 20 च्या तुलनेत JFM21 मधे 19% नी वाढला.

उद्योगाच्या संकलन(Recovery) क्षमतेत सुधारणा झाल्यामुळे, डिसेंबर 2020 च्या तुलनेत मार्च 2021 मध्ये सक्रिय कर्जाच्या  कसूर श्रेणींमधे सुधारणा दिसून येत आहे.

पोर्टफोलिओ शिल्लकबाकी मधे सूक्ष्मवित्त उद्योगाच्या 18% वाढीपेक्षा, पश्चिम बंगाल वर्षगतवर्ष तुलनेत 25% वाढीसह ईतर राज्यांमध्ये अग्रेसर आहे. महाराष्ट्र मार्च 2020 मधील 5 व्या स्थानावरून मार्च 2021 मध्ये 6 व्या स्थानावर गेला आहे. मार्च 2020 च्या तुलनेत मार्च 2021 मध्ये कर्नाटक वगळता सर्व शीर्ष राज्यांच्या 90+ कसूर दरात वाढ झाली आहे.

एमएफआय मधील शीर्षस्थ राज्यांच्या परिचालनाच्या अवलोकन करण्याच्या आमच्या प्रक्रियेमधे आम्ही या आवृत्तीत कर्नाटक राज्यासाठीचा व्यापक वृत्तान्त देत आहोत. कर्नाटकचा शिल्लकबाकी पोर्टफोलिओ 31 मार्च 2021 मधे ₹ 20,330 करोड होता जो मार्च 2020 ते मार्च 2021 च्या वर्षगतवर्ष तुलनेत 16% नी वाढला. कर्नाटक राज्यातील रकमेनुसार कर्जव्युत्पत्ती (Loan sourcing) प्रमाणात JFM 20 ते JFM 21 मध्ये वर्षगतवर्ष तुलनेत 12% नी वाढ झाली. 21. कर्नाटक राज्यासाठीचा एकूण 90+ कसूर दर मार्च 2020 मधील 2.41% च्या तुलनेत मार्च 2021 मध्ये 1.73% वर आला आहे.

कोविड संकट आणि त्याचा उत्तर, दक्षिण, पूर्व व पश्चिम या विभागांवरील प्रभाव या आवृत्तीत समाविष्ट केला आहे. वितरित केलेल्या एकूण रकमेमध्ये, पूर्व विभागाच 45% हे सर्वाधिक योगदान आहे. मार्च 2020 ते मार्च 2021 या काळातील एकूण वितरणामधे, बँकांचा सर्वच विभागामध्ये बाजारहिस्सा वाढला आहे. सरासरी तिकीट आकारामधे (एटीएस) दक्षिण विभागाने JFM 20 ते JFM 21 या काळात वर्षगतवर्ष तुलनेत 13% ची सर्वाधिक वाढ नोंदवली आहे.

# संक्षेप व शब्दावली

- ATS एटिस (सरासरी तिकीट आकार) = वितरित कर्ज रक्कम / कर्जांची संख्या
- DPD डीपीडी = परतावा दिनांक उलटल्यानंतरचे दिवस
- सदयकालीन शिल्लकबाकी पोर्टफोलियो किंवा उधारकर्ता किंवा सक्रीय कर्ज = 0 ते 179 डीपीडी + नवी खाती + वर्तमान खाती
- MFI एमएफआय = मायक्रोफायनान्स संस्था
- POS पीओएस = शिल्लकबाकी पोर्टफोलियो
- UT यूटी = केंद्रशासित प्रदेश
- AD महत्वाकांक्षी जिल्हे (एडी) - आरोग्य व आहार, शिक्षण, कृषी आणि जलस्त्रोत, वित्तीय समावेश, कौशल्य विकास आणि पायाभूत सुविधांसारख्या संयुक्त निर्देशकांच्या दृष्टीने मानव विकासांक वृद्दीच्या सुधारणेसाठी जानेवारी 2018 मध्ये नीती आयोग, भारत सरकारने निश्चित केलेले जिल्हे (सध्या संख्येने 117).

- 1-179 = 1 to 179 डीपीडी/ सदयकालीन पीओएस
- 1-29 = 1 to 29 डीपीडी/ सदयकालीन पीओएस
- 30-59 = 30 to 59 डीपीडी/ सदयकालीन पीओएस
- 60-89 = 60 to 89 डीपीडी/ सदयकालीन पीओएस
- 90-179 = 90 to 179 डीपीडी/ सदयकालीन पीओएस
- 30+ कसूर = 30-179 डीपीडी/ सदयकालीन पीओएस
- 90+ कसूर = 90-179 डीपीडी/ सदयकालीन पीओएस

- JFM'20 जेएफएम' 20 = जानेवारी 2020 ते मार्च 2020
- AMJ'20 एएमजे '20 = एप्रिल 2020 ते जून 2020
- JAS'20 जेएएस'=20 = जुलै 2020 ते सप्टेंबर 2020
- OND'19 ओएनडी'20 = ऑक्टोबर 2020 ते डिसेंबर 2020
- JFM'21 जेएफएम'21 = जानेवारी 2021 ते मार्च 2021

EQUIFAX


sidbi

# सूक्ष्मवित्त उद्योग अवलोकन



# सूक्ष्मवित्त उद्योगाचे आशुचित्र

मार्च 31 2021





| आशुचित्र - यथा 2021 31मार्च | Banks | SFBs | NBFC-MFIs | NBFCs | Not for Profit MFIs | Total Industry |
|---|---|---|---|---|---|---|
| अनन्य सक्रिय ऋणको(‘000) | 27,359 | 13,531 | 24,700 | 7,297 | 846 | 73,733 |
| सक्रिय कर्ज (‘000) | 41,529 | 16,779 | 36,368 | 7,866 | 1,108 | 103,650 |
| पोर्टफोलियो (₹ करोड) | 109,867 | 38,903 | 79,420 | 18,992 | 2,095 | 249,277 |
| वितरितरक्कम (₹करोड)-JFM21 | 48,665 | 11,603 | 27,395 | 4,671 | 766 | 93,100 |
| सरासरी तिकीट आकार एटीएस(₹)- JFM’ 21 | 43,417 | 36,993 | 35,223 | 41,256 | 32,037 | 39,627 |
| 30+ कसूर (POS) | 10.63% | 8.06% | 7.15% | 10.56% | 1.72% | 9.04% |
| 90+ कसूर (POS) | 4.81% | 3.51% | 3.33% | 5.06% | 0.95% | 4.12% |

- मार्च 2021 मधे सूक्ष्मवित्त उद्योगाचा एकूण शिल्लकबाकी पोर्टफोलियो ₹249,277 करोड आहे.
- शिल्लकबाकी पोर्टफोलियोमधे बँका आणि एनबीएफसी-एमएफआय यांच एकत्रित योगदान 75% पेक्षा अधिक आहे.
- JFM 21 तिमाहीतील ₹ 93,100 करोड कर्जवितरणात बँका 52% आणि एनबीएफसी-एमएफआय 29% योगदान देणारे आहेत.
- एनबीएफसी-एमएफआय, लघुवित्त बँका आणि ना-नफा-एमएफआय यांचा 30+ आणि 90+ कसूरदर उद्योगाच्या एकूण कसूर दरापेक्षा कमी आहे.

# सूक्ष्मवित्त उद्योग अवलोकन

कर्जदाता प्रकारानुसार बाजारांशचा कल




| Particulars | Mar' 20 | Jun' 20 | Sep' 20 | Dec' 20 | Mar' 21 |
|---|---|---|---|---|---|
| बँका | 81,001 | 91,920 | 93,409 | 96,683 | 109,867 |
| लघुवित्त बँका | 38,986 | 39,225 | 42,682 | 38,109 | 38,903 |
| एनबीएफसीएमएफआय- | 72,110 | 71,342 | 70,142 | 73,166 | 79,420 |
| एनबीएफसी | 18,073 | 19,875 | 19,838 | 18,988 | 18,992 |
| नाएमएफआय-नफा- | 1,679 | 1,842 | 1,772 | 1,872 | 2,095 |
| एकूण उद्योग | 211,849 | 224,204 | 227,843 | 228,818 | 249,277 |
| तिमाही-दर-तिमाहीवृद्धी दर % | - | 6% | 2% | 0% | 9% |

सूक्ष्मवित्त उद्योग कोविड-पूर्व परिस्थितीकडे परत येत आहे. उद्योगाचा डिसेंबर 2020 ते मार्च 2021 या काळात तिमाही-दर-तिमाही वृद्धी दर 9% तर मार्च 2020 ते मार्च 2021 या काळात वर्षगतवर्ष तुलनात्मक वृद्धी दर 18% होता.


- सर्व कर्जदात्यांमधे बँकांनीबाजारांशामद्दे , सातत्यानी वृद्धी करत सर्वात जास्त 36 %वर्षगतवर्ष वाढ नोंदवली. मार्च 2020 ते मार्च 2021 या काळात लघुवित्त बँका आणि एनबीएफसी-एमएफआय यांचा बाजार हिस्सा अंदाजे 2% नी कमी झाला आहे

# वितरणाचे कल



# वितरणाचे कल-संस्था निहाय

कर्जदाता प्रकारानुसार बाजारांशाचा कल





वितरीत कर्ज संख्या (लक्ष)

| कर्जदाता प्रकार | JFM‘ 20 | AMJ‘20 | JAS'20 | OND' 20 | JFM' 21 |
|---|---|---|---|---|---|
| बँका | 83 | 14 | 47 | 102 | 112 |
| लघुवित्त बँका | 31 | 5 | 12 | 20 | 31 |
| एनबीएफसी-एमएफआई | 73 | 2 | 33 | 65 | 78 |
| एनबीएफसी | 11 | 1 | 5 | 8 | 11 |
| ना-नफा-एमएफआय | 3 | 1 | 2 | 2 | 3 |
| एकूण उद्योग | 201 | 23 | 99 | 197 | 235 |

- कर्जवितरण JFM 21 या काळात JFM20 च्या वर्षगतवर्ष तुलनेत 26% नी वाढून ₹ 93,100 करोड झाले
- सर्व तिमाही मधे बँकांचे वितरणासाठीचे योगदान सर्वाधिक होते.
- कर्ज उत्पत्ती चा दर JFM 20 ते JFM 21 या दरम्यान 17% नी वाढला.
- बँकांच्या एकूण कर्ज वितरणात JFM 20 ते JFM 21 काळात 35% ने वाढ झाली.

# उद्योग तिकीट आकार- कल




वितरीत कर्जाची संख्या (लाखांमधे)

| Ticket Size | JFM' 20 | AMJ' 20 | JAS' 20 | OND' 20 | JFM' 21 | Y-o-Y growth rate % |
|---|---|---|---|---|---|---|
| 0K-10K | 9 | 2 | 4 | 34 | 19 | 111% |
| 10K-20K | 12 | 10 | 16 | 20 | 19 | 58% |
| 20K-30K | 46 | 2 | 18 | 33 | 39 | -15% |
| 30K-40K | 63 | 3 | 24 | 44 | 59 | -6% |
| 40K-50K | 33 | 2 | 18 | 29 | 38 | 15% |
| 50K-60K | 19 | 2 | 10 | 18 | 28 | 47% |
| 60K Plus | 19 | 2 | 9 | 19 | 33 | 74% |
| एकूण | 201 | 23 | 99 | 197 | 235 | 17% |
| तिमाही-दर-तिमाहीवृद्धी दर -% | - | -89% | 330% | 99% | 19% | - |
| अखिल भारतीय एटीएस (₹) | 36,723 | 28,577 | 35,519 | 33,190 | 39,627 | - |
| तिमाही-दर-तिमाहीएटीएस वृद्धीदर% | - | -22% | 24% | -7% | 19% | - |


JFM 21 दरम्यान एकूण 98 लाख मंजूर कर्जामधे, 42% कर्जे ही 20k ते 40k तिकीट आकार श्रेणी अंतर्गत होती.
0k-10k तिकीट आकार श्रेणीतील मंजूर कर्जाची वर्षगतवर्ष तुलनात्मक ही वाढ सर्वाधिक 111% दिसून आली.
OND 20 ते JFM 21 दरम्यान कर्ज वितरण आणि अखिल भारतीय एटीएस 19% नी वाढले

# उद्योग जोखमीची प्रोफाइल



# कसूर कल

परतावादिनांक उलटल्यानंतरच्या दिवसात कसूर




| Reporting Quarter | 1-29 days past due | 30-59 days past due | 60-89 days past due | परतावादिनांक उलटल्यानंतरच्यादिवसात कसूर<br>90-179 days past due | 1-179 days past due |
|---|---|---|---|---|---|
| Mar' 20 | 2.06% | 0.50% | 0.42% | 0.86% | 3.84% |
| Jun' 20 | 1.30% | 1.03% | 0.43% | 0.43% | 3.20% |
| Sep' 20 | 15.35% | 3.47% | 0.39% | 0.63% | 19.83% |
| Dec' 20 | 7.50% | 4.73% | 3.49% | 4.96% | 20.68% |
| Mar' 21 | 4.55% | 2.90% | 2.01% | 4.12% | 13.59% |

1 -179 DPD कसूरदर डिसेंबर 2020 मधील 20.68% वरून मार्च 2021 मध्ये 13.5% झाला.
1 - 29 DPD कसूर दर श्रेणीत डिसेंबर 2020 तुलनेत 3% घट झाली.
60-89 DPD श्रेणीत मार्च 2021 मध्ये सर्वात कमी कसूर दर दिसून आला

टीप कसूर परिगणनाधारित पोर्टफोलियो शिल्लकबाकी :.

# भौगोलीक व्याप्ती




# शीर्षस्थ दहा राज्ये: पोर्टफोलियो कल

| Top 10 States | Mar‘ 20 Portfolio Outstanding (`crore) | Rank | Mar‘ 21 Portfolio Outstanding (`crore) | Rank | Y-o-Y Growth % |
|---|---|---|---|---|---|
| पश्चिम बंगाल | 29,858 | 1 | 37,201 | 1 | 25% |
| तामिळनाडू | 27,077 | 2 | 31,248 | 2 | 15% |
| बिहार | 25,427 | 3 | 28,997 | 3 | 14% |
| कर्नाटक | 17,594 | 4 | 20,330 | 4 | 16% |
| महाराष्ट्र | 15,352 | 5 | 17,224 | 6 | 12% |
| उत्तर प्रदेश | 14,478 | 6 | 18,011 | 5 | 24% |
| ओडिसा | 12,489 | 7 | 14,178 | 8 | 14% |
| मध्य प्रदेश | 12,354 | 8 | 15,006 | 7 | 21% |
| आसाम | 11,025 | 9 | 10,498 | 10 | -5% |
| राजस्थान | 8,590 | 10 | 11,085 | 9 | 29% |
| शीर्षस्थ दहा राज्ये | 174,244 | - | 203,778 | - | 17% |
| ईतर | 37,605 | - | 45,499 | - | 21% |
| एकूण उद्योग | 211,849 | - | 249,277 | - | 18% |

मार्च 2020 आणि मार्च 2021 मध्ये पोर्टफोलियो शिल्लकबाकी साठी 80% पेक्षा जास्त योगदान शीर्ष 10 राज्यांचे आहे .
उद्योगाच्या पोर्टफोलिओवाढी च्या 18% दरा सापेक्ष पश्चिम बंगाल 25%वाढीसह अग्रेसर आहे.
मार्च 2021 मध्ये महाराष्ट्र 5 व्या स्थानावरून 6 व्या स्थानावर गेला आहे.

टीप: शीर्ष 10 राज्यांच वर्गीकरण मार्च 2020 मधील पोर्टफोलियो शिल्लकबाकी वर आधारीत आहे.
क्रमवारी पोर्टफोलियो शिल्लकबाकी निहाय

# शीर्षस्थ 10 राज्ये 90+कसूरदर कल




आसाम, पश्चिम बंगाल आणि महाराष्ट्राचा मार्च 2021 मधील 90+कसूरदर उद्योगाच्या कसूरदरापेक्षा जास्त आहे. कर्नाटक वगळता मार्च 2021 मधे सर्व शीर्ष राज्यांचा 90+कसूरदर मार्च 2020 च्या तुलनेत वाढला आहे.

टीप: शीर्ष 10 राज्यांच वर्गीकरण मार्च 2020 मधील पोर्टफोलियो शिल्लकबाकी वर आधारीत आहे.
कसूरदर पोर्टफोलियो शिल्लकबाकी वर आधारीत आहे

# सर्वसमावेशक राज्य प्रोफाईल


# कर्नाटक




Powering the World with knowledge ™

# दृष्टिक्षेप: कर्नाटक राज्य


सक्रीय कर्ज ('000)




पोर्टफोलियो (₹ करोड)




वितरीत रक्कम (₹ करोड)-JFM' 21




Banks SFBs NBFC-MFIs NBFCs Not for Profit MFIs

| कर्नाटक यथा 2021 मार्च 31 | Banks | SFBs | NBFC-MFIs | NBFCs | Not for Profit MFIs | Total Industry |
|---|---|---|---|---|---|---|
| सक्रीय कर्ज (000) | 2,612 | 1,351 | 3,844 | 868 | 1 | 8,676 |
| पोर्टफोलिओ शिल्लकबाकी (₹ करोड) | 5,455 | 3,059 | 9,734 | 2,078 | 4 | 20,330 |
| पोर्टफोलिओ शिल्लकबाकीचा बाजारांश | 27% | 15% | 48% | 10% | 0% | - |
| वितरीत रक्कम (₹ करोड)- JFM' 21 | 2,532 | 914 | 3,584 | 524 | 1 | 7,555 |
| सरासरी तिकीट आकार )ATS)(₹) - JFM' 21 | 33,933 | 37,389 | 38,315 | 41,603 | 44,856 | 36,814 |
| 30+ कसूर दर (POS) | 3.48% | 5.71% | 3.02% | 6.29% | 1.77% | 3.88% |
| 90+ कसूर दर (POS) | 0.87% | 2.71% | 1.72% | 2.62% | 0.49% | 1.73% |

• 31 मार्च 2021 ला कर्नाटकची पोर्टफोलिओ शिल्लकबाकी ₹20,330 करोड होती.
पोर्टफोलिओ थकबाकीमध्ये सर्वाधिक 48% बाजारांश एनबीएफसी-एमएफआयचा आहे
कर्नाटकात JFM 21 दरम्यान कर्ज वितरणाची रक्कम ₹7,555 करोड होती.

• एनबीएफसी, एनबीएफसी-एमएफआय, लघुवित्त बँका आणि ना-नफा-एमएफआय च सरासरी तिकीट आकारमान (एटीएस) कर्नाटकच्या एकूण एटीएस पेक्षा जास्त आहे.
कर्नाटकात बँका आणि ना-नफा-एमएफआय चा 90+ कसूर दर 1% पेक्षा कमी आहे


# कर्नाटक
# कर्जवितरण कल

वितरीत कर्जे संख्या ('000)

| तिकीट साईज | JFM' 20 | AMJ' 20 | JAS' 20 | OND' 20 | JFM' 21 |
|---|---|---|---|---|---|
| 0K-10K | 253 | 21 | 94 | 232 | 185 |
| 10k-20k | 231 | 94 | 188 | 159 | 193 |
| 20k-30k | 375 | 10 | 137 | 267 | 347 |
| 30k-40k | 480 | 16 | 200 | 398 | 496 |
| 40k-50k | 272 | 9 | 152 | 242 | 326 |
| 50k-60k | 135 | 6 | 82 | 173 | 226 |
| 60k Plus | 83 | 4 | 98 | 236 | 278 |
| एकूण | 1,829 | 160 | 951 | 1,707 | 2,051 |


कर्नाटक राज्यात JFM 20 ते JFM 21 या काळात कर्ज उत्पत्तीमधे वर्षगतवर्ष तुलनेत 12% ची वाढ दिसून आली. सर्व तिमाहीत, AMJ 20 वगळता 30k-40k तिकीट आकार श्रेणीमध्ये सर्वाधिक कर्ज वितरीत केले.

# कर्नाटक पोर्टफोलियो कल




कर्नाटकच्या पोर्टफोलिओची शिल्लकबाकी मार्च 2020 ते मार्च 2021 दरम्यान 16% नी वाढली. पोर्टफोलिओ शिल्लकबाकीमधे सर्वाधिक बाजारांश एनबीएफसी-एमएफआय चा असून त्यानंतर बँकांचा आहे बँकांचा बाजारांश वाढत असून तो मार्च 2020 मधील 20% वरून मार्च 2021 मध्ये 27% पर्यंत वाढला.

# कर्नाटक :कसूर कल




- मार्च 2020 च्या तुलनेत मार्च 2021 मध्ये कर्नाटकचा एकंदरीत 90+ कसूर दर सुधारला आहे. मार्च 2020 मधील 2.41% वरुन तो मार्च 2021 मध्ये 1.73% वर आला आहे.
- बँकांचा 90+ कसूर दर मार्च 2020 च्या 3.14% तुलनेत मार्च 2021 मध्ये 0.87% झाला

टीप : कसूरदर पोर्टफोलियो शिल्लकबाकी वर आधारीत आहे

# महत्वाकांक्षी जिल्हे




Powering the World with knowledge ™

# महत्वाकांक्षी जिल्हे


मार्च 2021

पोर्टफोलियो (₹ करोड)

वितरीत रक्कम (₹ करोड)– Apr' 20 to Mar' 21




कर्जदाताप्रकारानुसार +90 व +30पोर्टफोलियो शिल्लकबाकी कसूर दर




महत्वाकांक्षी जिल्हे वाढीचा तपशील

| | December 2017 | March 2021 | Growth % |
|---|---|---|---|
| सक्रिय कर्जदार उत्पत्ती(000) | 4,155 | 8,544 | 106% |
| वितरीत रक्कम )₹करोड( | 14,374 * | 27,397 ** | 91% |
| सक्रिय कर्ज (000) | 6,925 | 13,681 | 98% |
| पोर्टफोलियो शिल्लकबाकी )₹करोड( | 11,175 | 31,856 | 185% |
| +30कसूरदर | 1.54% | 7.68% | - |
| +90कसूरदर | 0.75% | 3.32% | - |

31 मार्च 2021 पर्यन्त महत्वाकांक्षी जिल्ह्यांमधील एकूण ₹31,856 करोड पोर्टफोलियो शिल्लकबाकी मधे बँकांचे 43%

- योगदान असून त्यानंतर एनबीएफसी- एमएफआयच 35% योगदान आहे.
- एनबीएफसी चा 30+ आणि 90+ कसूरदर
- सर्वाधिक असून त्यानंतर बँकांचा आहे.

डिसेंबर 2017 ते मार्च 2021 पर्यन्त पोर्टफोलियो शिल्लकबाकी मधे 185% तर वितरण रक्कमेत 91% वाढ झाली.

टीप ** मधील कर्जवितरण 2017 ते डिसेंबर 2017 जानेवारी * :एप्रिल 2020ते मार्च 2021मधील कर्जवितरण..
कसूरदर पोर्टफोलियो शिल्लकबाकी वर आधारीत.

# कोविड19- तथा भौगोलिक कल




# विभागानुसार बाजारांश

कोविड-19चे सूक्ष्मवित्तक्षेत्रावर प्रभावाचे विश्लेषण करण्यासाठी एकूण कर्ज वितरणाच ,कर्जदात्यांचा बाजारपे**ठेतील** हिस्सा आणि सरासरी तिकीट आकार (एटीएस) यांचा विविध विभागामधील कल याच विश्लेषण केले गेले. कर्जदात्यांनी सादर केलेल्या आकड्यांच्या आधारे विभाग निश्चित केले असून आकडेवारीची तुलना वर्षगतवर्ष आधारावर आणि जेएफएम 20 हा कोविडपूर्व कालावधी मानून केली.

**वितरणावर आधारीत विभागीय बाजारांश**


JFM' 20

**वितरीत रक्कम ₹**73,736 **करोड**




JFM' 21

**वितरीत रक्कम ₹**93,100 **करोड**





East West North South

- एकूण वितरित रकमेमध्ये सर्वाधिक 45% योगदान पूर्व विभागाच आहे.
- साधारणपणे विभाग-निहाय बाजारांशाचा कल जेएफएम 20 प्रमाणेच आहे केवळ उत्तर विभागा मध्ये 1% वाढ तर दक्षिण क्षेत्रात 1% घट आहे.

टीप: पूर्व क्षेत्र - अरुणाचल प्रदेश, आसाम, बिहार, छत्तीसगड, झारखंड, मणिपूर, मेघालय, मिझोराम, नागालँड, ओरिसा, सिक्कीम, त्रिपुरा आणि पश्चिम बंगाल.
पश्चिम क्षेत्र - दादरा आणि नगर हवेली, दमन आणि दीव, गोवा, गुजरात, मध्य प्रदेश, महाराष्ट्र आणि राजस्थान
उत्तर क्षेत्र - चंदीगड, दिल्ली, हरियाणा, हिमाचल प्रदेश, जम्मू आणि काश्मीर, पंजाब, उत्तर प्रदेश आणि उत्तराखंड.
दक्षिण क्षेत्र - अंदमान आणि निकोबार बेटे, आंध्र प्रदेश, कर्नाटक, केरळ, लक्षद्वीप, पाँडिचेरी, तामिळनाडू आणि तेलंगणा

# विभाग व कर्जदाताप्रकारा-न्वये बाजारांश


वितरीत रककमे आधारीत क्षेत्र व कर्जदात्यांचा बाजारांश




मार्च 2020 ते मार्च 2021 मधे सर्व विभागांमध्ये मध्ये बँकांचा बाजारांश वाढला आहे, उत्तर क्षेत्रामध्ये सर्वाधिक 7% वाढ नोंदवली आहे. बँकांव्यतिरिक्त, केवळ एनबीएफसी-एमएफआयनी फक्त दक्षिण क्षेत्रामध्ये बाजारांशात वाढ नोंदवली आहे.

# सरासरी तिकीट आकारातील कल

विभागवार सरासरी तिकीट आकारातील कल




- वर्षगतवर्ष तुलनेत दक्षिण विभागात एटीएस मधे JFM 20 ते JFM 21 या काळात सर्वाधिक 13% ची वाढ झाली.
- पश्चिम आणि उत्तर विभागाच्या एटीएस मधे JFM 20 ते JFM 21 या काळात 9% वाढ झाली.

**सिडबी बद्दल**

भारतीय लघुउद्योग विकास बँकेची (सिडबी) स्थापना 1990 साली संसदेच्या अधिनियमनामान्वये झाली. सूक्ष्म, लघु व मध्यम उद्योगक्षेत्राच्या (एमएसइ) प्रोत्साहन, वित्तपुरवठा आणि विकासाची तिहेरी कार्यावली अमलात आणण्यासाठी आणि तत्सम कार्ये करणाऱ्या संस्थांमध्ये समन्वय साधण्यासाठी सिडबीला प्रमुख वित्तीय संस्था म्हणून कार्य करण्यासाठी अधिकृत केलेले आहे. इतक्या वर्षांमध्ये तिच्या विविध वित्तीय आणि विकासाच्या उपायांद्वारे बँकेने समाजाच्या विविध स्तरांतील लोकांच्या जीवनात स्थान मिळविले आहे. तिने एमएसएमइ च्या समग्र वर्णपटातील उपक्रमांवर प्रभाव टाकला आहे आणि एमएसएमइच्या परिसंस्थेतील अनेक विश्वासार्ह संस्थांशी सलग्न झाली आहे.

व्हिजन 2.0 अंतर्गत सिडबीने एमएसएमइ विभागाच्या माहीतीची विषमता संबोधित करताना एमएसएमइ पल्स, एमएसएमइ चे आणि क्रिसायडेक्सचे हेल्थ ट्रॅकर, एमएसइ भावना व आकांक्षांचे मापन, इंडस्ट्री स्पॉटलाइट आणि उद्योगक्षेत्रांवर एक सर्वकष अहवाल आणि फिंटेक पल्स, मायक्रोफायनान्स पल्स शिवाय फिंटेक लेंडिंग विभागावरील क्रेडीट डेटा अंतरदृष्टी अशा अनेक उपक्रमांचे नेतृत्व केले.

**मायक्रोफायनान्स क्षेत्रामध्ये सिडबी**

मायक्रोफायनान्स चळवळीला पाठींबा देत समावेशक वित्तविषयक कार्यावली पुढे नेण्यासाठी सिडबीने अग्रणी भूमिका बजावली आहे. बँकेच्या सूक्ष्मवित्त उपक्रमांतर्गत 31 मार्च 2021 पर्यंत वितरित केलेली एकत्रित मदत ₹20,568 करोड आहे, ज्याचा लाभ सुमारे 4 कोटी घटकांना झाला. एमएफआयना वित्त पुरवठा आणि समन्यायी पाठबळ देण्यासह या संस्थांना क्षमता बांधणीचा आधार देऊन अनुपालन मूल्यांकनाच्या साधनांद्वारे कॉर्पोरेट संस्कृती आत्मसात करण्यात सिडबीची भूमिका अग्रणी राहीली आहे. मायक्रोफायनान्स उद्योगाच्या सुरवातीच्या नाजूक काळात हातात हात घेऊन तो पूर्णपणे विकसित उद्योग विभाग होण्यापर्यन्तचे पूरक समर्थन, आमच्या 8 भागीदार एमएफआयना एसएफबीज/ युनिव्हर्सल बँक्सचे संक्रमणात संचयन करणे. बाजारभावापेक्षा बऱ्यापैकी कमी व्याजदरात थेट सिडबी कडून (भागीदारी करारा द्वारे ) लघु कर्जांची उपलब्धता करण्याचा सूक्ष्म कर्ज पुरवठ्यातील पथदर्शी पुढाकार. 'प्रयास' या शीर्षकांतर्गत पिरॅमिडच्या पायथ्याशी असणाऱ्या सूक्ष्म ऋणकोंसाठी बाजारभावापेक्षा तुलनेने कमी व्याजदरात भागीदारी मॉडेल अंतर्गत 0.5 लाख ते 5 लाख पर्यन्तच्या लघु तिकीट आकाराच्या कर्जांचा विस्तार सिडबीबँक करत आहे.

**इक्विफॅक्स बद्दल**

इक्विफॅक्स ही एक ग्लोबल इन्फॉर्मेशन सोल्युशन्स कंपनी आहे. जी विश्वासार्ह, अद्वितीय माहीतीचा वापर सृजनशील पृथक्करणात, तंत्रज्ञान आणि उद्योग कौशल्याचा उपयोग जगातील व्यक्ती व संस्थांना ज्ञानाचे अंतरदृष्टीत रुपांतर करून देण्यात करते. जे वैयक्तिक निर्णयात आणि माहितीपूर्ण व्यवसायात मदत करतात.

अटलांटा (जॉर्जिया, यूएसए) येथे मुख्यालय असलेली इक्विफॅक्स ही उत्तर अमेरिका, मध्य व दक्षिण अमेरिका, युरोप व आशिया पॅसिफिक विभागातील 24 देशांमध्ये गुंतवणूक व संचालन करते. स्टँडर्ड आणि पुअर (एस अँड पी) 500® निर्देशांकाची इक्विफॅक्स सदस्य असून तिच्या सामान्य भागांची (कॉमन स्टॉक) न्यूयॉर्क स्टॉक एक्स्चेंज (एनवायएसइ) वर EFX या चिन्हाखाली देवाणघेवाण होते. इक्विफॅक्सचे जगभरात 11,000 कर्मचारी आहेत. पत उद्योगातील 120 वर्षांच्या जागकतिक अनुभवाच्या वारश्यासह इक्विफॅक्स ने भारतीय बाजारात 2010 मध्ये आपली उपस्थिती प्रस्थापित केली आणि रिझर्व्ह बँकेने CIC म्हणून काम करण्याचा परवाना दिला. गत 9 वर्षात क्रेडीट ब्युरोमधे बँका, एनबीएफसी, एमएफआय आणि विमाकारांच्या समावेशासह 4000+ सदस्यांसह वाढ झाली. हे सदस्य लक्षावधी भारतीय ग्राहकांची जनसंख्या आधारीत आणि परतफेडीची माहीती प्रदान करतात. इक्विफॅक्सने 2014 मध्ये एका विश्लेषक व्यवसाय संस्थेच्या अधिग्रहणातून भारतातील आपल्या पाऊलखुणा अधिकच घट्ट केल्या. इक्विफॅक्स ॲनालिटिक्स प्रा. लिमिटेड ही इक्विफॅक्सच्या संपूर्ण मालकीची विश्लेषक संस्था आहे, जी अद्वितीय सानुकूलित विश्लेषणात्मक उपाय प्रदान करते जे व्यवसायांची कार्यक्षमता आणि ग्राहकांचे जीवन या दोघांना समृद्ध करते.

**अस्वीकरण**

मायक्रोफायनान्स पल्स (अहवाल) इक्विफॅक्स क्रेडीट इन्फॉर्मेशन सर्विसेस प्रायव्हेट लिमिटेड (इक्विफॅक्स) द्वारा तयार करण्यात आले. या अहवालाच्या वापराद्वारे वापरकर्ता या अस्वीकाराणच्या आधीन राहून त्याची स्वीकृती देतो. इक्विफॅक्सचे जे सभासद आहेत त्या मायक्रोफायनान्स संस्थांच्या मार्च 2021 च्या पर्याप्त माहीती प्रदानावर आणि त्या माहीतीच्या सविस्तर तौलकनि प्रक्रियेवर आधारीत हा अहवाल आहे. इक्विफॅक्स अहवाल तयार करताना पुरेशी काळजी घेत असते. परंतु मायक्रोफायनान्स संस्थांनी सदर केलेल्या अयोग्य व चुकीच्या माहीतीमुळे अहवालात उद्भवत असलेल्या चुकांबाबत /त्रुटींबाबत इक्विफॅक्स उत्तरदायी असू शकत नाही. शिवाय, इक्विफॅक्स अहवालातील माहीतीच्या पूर्णतेची किंवा पर्याप्ततेची आणि/ किंवा कुठल्याही विशिष्ट उद्देशासाठी त्याच्या उपयुक्ततेची हमी देत नाही. किंवा, अहवालाच्या कुठल्याही उपयोगासाठी इक्विफॅक्स उत्तरदायी नाही आणि इक्विफॅक्स अशा सर्व उत्तरदाकयत्वाचा स्पष्टपणे अस्वीकार करते. हा अहवाल कुठल्याही उपयोजन,उत्पादन/ परिणामाच्या नकार/ अस्वीकृती अथवा स्वीकृतीची अनुशंसा करत नाही किंवा इक्विफॅक्स i)कर्ज देणे वा न देणे ii) व्यक्ती संबंधित/ संस्था संबंधित कुठल्याही आर्थिक व्यवहारात उतरणे वा न उतरण्याची अनुशंसाही करत नाही. या अहवालातील माहीती कुठल्याही प्रकारचा सल्ला स्थापित करत नाही आणि या अहवालातील माहीतीच्या आधारे कुठल्याही प्रकारचा निर्णय घेण्यापूवी वापरकर्त्याने त्याच्या मते योग्य असणारे सर्व आवश्यक विश्लेषण केले पाहीजे. या अहवालाचा वापर क्रेडीट इन्फॉर्मेशन कंपनीज (नियंत्रण) कायदा 2005, क्रेडीट इन्फॉर्मेशन कंपनीज रेग्युलेशन 2006, क्रेडीट इन्फॉर्मेशन कंपनीज रूल्स, 2006 मधील तरतुदी द्वारा नियंत्रित केला जातो. पूर्व परवानगी शिवाय या अहवालाच्या कुठल्याही भागाच्या प्रती तयार, वितरित वा प्रकाशित करू नये.

इंग्रजीतून मराठीत केलेल्या भाषांतरात काही अस्पष्टता / तफावत आढळल्यास, इंग्रजीतील संबंधित मजकूर / संदर्भ ग्राह्य धरला जाईल.

**संपर्क तपशील**

इक्विफॅक्स क्रेडीट इन्फॉर्मेशन सर्विसेस प्रायव्हेट लिमिटेड
युनिट क्र. 931, 3 रा मजला, बिल्डिंग/ इमारत क्र. 9,
सॉलीटेअर कॉर्पोरेट पार्क , अंधेरी घाटकोपर लिंक रोड ,
अंधेरी (पूर्व), मुंबई - 400 093
टोलफ्री क्र.: 1800 2093247
ecissupport@equifax.com

भारतीय लघुउद्योग विकास बँक (सिडबी)
स्वावलंबन भवन, प्लॉट नं. सी-11, 'जी' ब्लॉक,
बांद्रा कुर्ला कॉम्प्लेक्स, बांद्रा (पूर्व ),
मुंबई - 400 051 महाराष्ट्र
टोलफ्री क्र.: 1800 226753
www.sidbi.in/en

**प्रकाशन अधिकार ® 2021 इक्विफॅक्स इंकॉ. अटलांटा, जॉर्जिया. सर्व हक्क राखीव. इक्विफॅक्स हे इक्विफॅक्स (इंक.)चे नोंदणीकृत व्यापार चिन्ह आहे.**